2019-20

50 47 A

ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# HI-TECH RESEARCH ANALYSIS

Hi-Tech Research Analysis

EDITOR IN CHIEF
DR. BALAJI KAMBLE

A ??

०१-१०-२०

IMPACT FACTOR
6.05

डॉ. अंकुश शुभा (?)

ISSN 2231- 6671

*International Registered & Recognized*

*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XIX, Vol. - V
Year - X, (Half Yearly)
Aug. 2019 To Jan. 2020

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur.
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (Mob. 09423346913)

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Sunanda Rodge**
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C. Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

Issue : XIX, Vol. V
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.05
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan. 2020

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Induced Mutation on Green Pod yield in Okra (Abelmoschus esculentus L. Moench<br>**M. M. Dhore** | 1 |
| 2 | Credit Co-operatives and Financial Sector Reforms<br>**Dr. Dadasaheb Jogdand** | 11 |
| 3 | Performance of District Central Co operative Banks in Maharashtra<br>**C. P. Kothawale** | 15 |
| 4 | Microbiological Quality of Marketable Raw Mutton in Latur City and its public health significance<br>**G. S. Biradar, Dr. L. M. Karanjkar** | 22 |
| 5 | Prevalence and antibiotic sensitivity pattern of Pseudomonas aeruginosa in urinary tract infections in hospitals of Omerga region (Maharashtra), India<br>**S. B. Mali, S. M. Dulange** | 28 |
| 6 | हिन्दी कहानियों में नारी का पारिवारिक परिवेश<br>**डॉ. सूर्यकांत दळवे** | 37 |
| 7 | वृद्धावस्थेतील वाढत्या शारीरिक व मानसिक समस्या आणि समायोजन<br>**नलिनी अनिल बोडखे** | 42 |
| 8 | मराठवाड्यातील सामाजिक आधारभूत संरचनेतील पेयजल पुरवठ्याचा विकास<br>**डॉ. सुरेश वसंतराव खोंड** | 47 |
| 9 | प्रस्थापित व्यवस्थेने पाठीवर लादलेलं वेदनेचं 'बिराड'<br>**डॉ. अंकुशकुमार चव्हाण** | 54 |
| 10 | भारतातील जातीबध्द विषमता आणि राजकीय आरक्षण<br>**डॉ. रब्बानी आर. सय्यद** | 63 |

Issue - XIX, Vol. V
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.05
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan. 2020


9

# प्रस्थापित व्यवस्थेने पाठीवर लादलेलं वेदनेचं 'बिराड'

डॉ. अंकुशकुमार चव्हाण

## Research Paper - Marathi

माणसाने माणसाचे जातिधर्माच्या नावाखाली मूलभूत हक्क हिरावून घेऊन त्याला पशुतुल्य जीवन जगायला भाग पाडले. माणसालाच माणसाने नग्न करून त्याला भाकरीसाठी चारी दिशा फिरविले. पोटाची खळगी भरण्यासाठी त्याला पराकोटीचे दुःख, यातना, दैन्य, दास्य भोगावे लागले. हे दुःख इतके भयावह की, जीवनानेच हतबल व्हावे. जगण्याचे सर्व मार्ग बंद झाल्याने हे जीवनच अशा लोकांना एक शिवी वाटायला लागते. माणसाने माणसाला कसे नागवे करून पराकोटीचे दुःख भोगायला भाग पाडले याचा वेदनाप्रवास अशोक पवार यांच्या 'बिराड़' या आत्मकथनातून पाहावयास मिळतो. तथाकथित सुसंस्कृत समाजाने बाजूला लोटून, गुन्हेगार समजून अन्याय अत्याचार केलेल्या 'बेलदार' समाजाच्या यातनामय दुःखाचा आलेख चित्रित करणारे हे आत्मकथन आहे.

अशोक पवार यांनी अत्यंत संघर्षमय जीवन जगून आपल्या समाजाच्या यातना आत्मकथनाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविल्या आहेत. बेलदार जातीच्या भीषण दुःखाचा चेहरा दर्शविणरे मराठीतील हे अत्यंत महत्त्वपूर्ण असे आत्मकथन आहे. अत्यंत भयावह अमानवीय जगणे अशोक पवार व त्यांच्या समाजाला या व्यवस्थेने बळजबरी भोगायला भाग पाडले यातच या आत्मकथनातील दुःखाचे, यातनांचे पदर दडलेले आहेत. हे बिऱ्हाड कुण्या जनावराच्या किंवा गाढवाच्या पाठीवरचे ओझ ो नसून हे बिऱ्हाड आहे अज्ञान अंधश्रद्धेचे, दारिद्र्य-दैन्य आणि दास्याचे, जातीधर्माच्या शोषक समाज व्यवस्थेचे हे बिऱ्हाड आहे, पोटासाठी वणवण भटकणाऱ्या भुकेचे, समाजव्यवस्थेने स्व-हक्कापासून वंचित ठेवणाऱ्या गुलामीचे. असे हे बिऱ्हाड वेदनेचे दुःख, दैन्य आणि गुलामीचे प्रतीक आहे. अशोक पवार यांनी आपल्या जातीच्या पराकोटीचे दुःख समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

भटक्या जातींपैकीच भटकणे हे परिमाण माणून बेलदार जात सतत भटकंती करणारी जीवनातील सुखाची आस धरत, दु:खाची उकल करून अंधश्रद्धेने माखलेली ही जात आहे. मरतुकड्या गाढवावर आपला संसार लादून 'आज इथं उद्या तिथ' जीवन जगणारा हा 'बेलदार' समाज आहे. फार पूर्वी राजस्थानमधून येऊन मोगलांच्या धर्मांतराच्या भीतीने महाराष्ट्रात स्थायिक झाला. यांची मातृभाषा राजस्थानी-मेवाडी असून त्यांचे श्रद्धास्थान महाराणा प्रतापसिंह आहेत. तर कान्हुसतीमाय कुलदैवत आहे. बेलदार समाज अत्यंत कष्टाची कामे करून समाजाचे अनेक दु:खद हिंदोळे गिळत जगत आला आहे. याचे यथोचित वास्तव चित्रण अशोक पवार यांनी 'बिराड' मधून केलेले दिसते.

आपल्या देशाने स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा केला. पण खरोखर स्वातंत्र्याचा देदीप्यमान प्रकाश अशोक पवार यांच्या पालापर्यंत पोहोचला आहे का? असा प्रश्न पडतो. मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात बेलदाराच्या पालात जन्माला आलेला अशोक पवार स्वत:च्या जीवघेण्या, अव्हेरलेल्या आयुष्याची कथा सांगतो तेव्हा ती एकट्या अशोकची कथा राहत नाही तर येथील व्यवस्थेने मूलभूत गरजा नाकारलेल्या अखिल भटक्या-विमुक्तांची ती कथा होते. कष्टाळू बेलदार समाज घर बांधण्याचे, विहीर खोदण्याचे काम करतात. साथीला मरतुकडी गाढवे आणि पाल असते. कोंबड्या, बकऱ्या, कुत्रे आणि असल्यास एखादी खाट घेऊन या गावावरून त्या गावी अशी सतत भटकंती सुरू असते. कुठल्याही गावात तीन दिवसांपेक्षा अधिक काळ नियमानुसार राहता येत नाही. मुक्कामही जेथे जनावरेही फार काळ राहात नाही अशा गावाशेजारील गोद्रीत असतो. तथाकथित सुसंस्कृत समाजाने बेलदार जातीला चोर, बदमाश, गुन्हेगार म्हणून प्रमाणपत्र दिलेले. चौथ्या दिवशी गाव बदलण्याच्या वेळेला गावचा पाटील, कोतवाल आणि पोलिसांची परवानगी अशा सरकारी नियमांमुळे या तिघांचेही फावलेले जर मुक्कामात हयगय झाली तर तिघांचीही रंगबाजी करावी लागते. पोटासाठी सतत भटकंती करणाऱ्या या समाजाच्या भूक ही तर पाचवीला पूजलेलीच आहे. म्हणूनच अत्यंत समंजसपणे लेखक हे आत्मकथन 'जगाच्या पाठीवर पोटाच्या आगीसाठी भटकणाऱ्या तमाम जिवांना' अर्पण करतात. आपल्या जातीच्या दु:खाची व्यथा सांगताना लेखक म्हणतात-

''मी अशा जातीत जन्मलो की ज्या जातीला माणूस म्हणून जगताच येत नाही. घर नाही, दार नाही, गाव नाही, ना दोन वेळच्या पोटाची सोय. माणूस मेला तरी पुरण्यासाठी किंवा जाळण्यासाठी स्वत:ची साडेतीन हात जागा नाही.''

अशी या जातीची अवस्था. लेखकाच्या अर्पण पत्रिकेतून व मनोगतातील या पहिल्याच ओळीपासून त्यांच्या प्रतिभा सामर्थ्याला प्रत्यय यायला लागतो. रात्रंदिवस राबराब राबून दोन वेळेच्या

अन्नाचीही शाश्वती नाही. मातीच्या भिंती उभारून दगडाला चिरे पाडूनही भूक यांच्यासोबत सावलीसारखी सोबत करणारी. वडिलांनी, आईने, लेखकाने फोडलेले चिरे गाढवावरून वाहिले. दिवसभर कष्ट केल्याने रात्री भूक लागते तेव्हा आजीने गावातून मागून आणलेले शिळे तुकडे, बुरा आलेल्या भाकरी व विटलेली भाजी खाऊन दिवस कसे काढावे लागले याचे हुबेहूब चित्रण लेखकाने केले आहे. ''पाटं बुढीनं भाक्रीचे टुकडे आन कोलड्यास गावातून भीक मागून आनलंत ते तसचं होतं. कोलड्यासावर फसफस फेस आलेला. भाक्री शिळ्या कडक बुरसटलेल्या. हामी समद्यानं वाढून घेतलं. टुकडे हातानं तुटत न्हव्हते मग दातानं चघळून परातीत टाकलू. वरून कोलड्यास टाकलू काला केला आन लागलू फर फर वरपायला. आंबट आंबट लागू लागलं. वरपता वरपता कोपरावर वगळ आले. परात लुसुन पुसुन खाल्ली. जिबनं चाटली. ती धुवुन गटागटा पाणी पेलु. पोट टम भरलु सुस्ती चटली.'' भूक लागल्यावर घरात काही खाण्यासाठी नसेल तर लेखकाची आई लेखकाला आभाळाकडे बघ म्हणायची. लेखक आभाळाकडे बघत असताना त्यांची नजर अचानक समोर जाते. समोर एका लंगड्या कुत्र्याच्या तोंडात भाकरीचा टुकडा असतो. लेखक त्याच्या पाठीमागे लागतो. मागे-पुढे पळता पळता कुत्रे समोरील हौदाला ठेचाळून विहिरीत पडले. पण भाकर त्या हौदाजवळ पडलेली होती. लेखकाने ती भाकर उचलून कुत्र्याची लाळ लागलेला भाग काढून टाकून आपली भूक भागविली. पोटाची भूक भागविणे हा भटक्या जमातीचा नेहमीचाच प्रश्न आहे. ही भूक कधी सोशिकपणा, कधी उद्रेक, कधी लबाडी तर कधी चोरी, सिंदळकी करायला लावते. हीच भूक कधी नीती-अनीतीचे भानही विसरायला भाग पाडते. पावसाळ्यात पाऊस असल्याने कामधंदे बंद असतात. त्यामुळे उपाशी राहण्याची वेळ येते. घरात जे शेर-पसा असेल त्यावरच अनेक दिवस काढावे लागतात. पण ते संपल्यावर झाडपाला खाल्ल्याशिवाय दुसरा उपाय नसतो. नुकताच पावसाळा सुरू झाल्याने शेतात तरूटा धामना, किंवा अंबाडीचा पाला आलेला नसतो. धामनेच्या फांजचा पाला खाऊन कसे दिवस काढावे लागले याचे वर्णन करताना लेखक म्हणतो- ''कसतरी अंबाडीचा अन् तरूट्याचा पाला खाऊन भूक भागवता आली असती. पर नेमकीच बरसात लागलेली, तेबी वाढलेला नाही. आता भुकनं हामी मरणार. खान्यावाचून मरणार. असा समदे ईचार करत व्हते. मग एक आटकल ध्यानात आली. बायका मळ्यात गेल्या. धामनाचा अन् फांजचा पाला धिऊन आल्या. शिजवला. मीठ टाकून समद्याला वाढला. खाल्ला, समदं चिकट लोळ लागत व्हतं. मग असं अन् असंच रोज चाललं''

अशा भुकेच्या अनेक आर्त कहान्या यात आहेत. माणूस अन्नासांठी कसा तरसतो, तडफडतो याची दैना आहे. पावसाळ्यात कामधंदे बंद पडल्यामुळे उपाशी मरायची वेळ आली. उपाशी राहण्यापेक्षा मीठ टाकून पाला शिजवून खावा लागे. यामुळे आजारी पडावे लागते. अशातच तात्याला

नाल्यावर मरून पडलेली शेळी दिसते. तिच्या पोटात आळ्यांचे गोळे, सगळीकडे दुर्गंधी पसरलेली. अशा अवस्थेतही एक वेळेची भूक भागविण्यासाठी ती या बेलदारांना खावी लागते. अशा या भीषण भूक निवारणाबद्दल अशोक पवार यांनी साधे निरीक्षण नोंदविले आहे. एक सुन्न करणारे वास्तव आणि भूक भागण्याचे वास्तव असे वास्तवाचे दोन वाटे करून ते आपल्यासमोर ठेवतात. जीवनाचे हे भयाणपण मग आपल्यालाही कुरतडू लागते. भटक्या समाजात अज्ञान, दारिद्र्य, दास्य, अत्याचार यासोबत अंधश्रद्धाही असते. ही अंधश्रद्धा जळूसारखी त्यांच्या आयुष्याला चिकटलेली दिसते. या अंधश्रद्धेमुळे त्यांच्या आयुष्यातला जीवनरसच शोषून घेतला. सतीमायचे बेलदारांच्या आयुष्यातील स्थान, मांत्रिकाचे महत्त्व आणि त्यांना घाबरणाऱ्या संपूर्ण समूहाचे चित्रण अशोक पवार यांनी केले आहे. बकरी, हेला आदी प्राण्यांचे देवाला बळी देण्याची पध्दत, बुढ्या भगताचे महत्त्व. थोडेही काही घडले तरी अंगात देव आणून निंराकरण करून घेणे या समग्र चित्रणातून हा समाज अंधश्रद्धेच्या गर्तेत किती फसलेला आहे याचा प्रत्यय येतो. अंधश्रद्धेशी सलगी करणारा लेखकाच्या आजोबाचा शेवट अंधश्रद्धेमुळेच होतो. आजोबा खूप दारू प्यालेला असतो. त्यामुळे उलट्या होतात परिणामी हातापायाला गळ येते. आजोबा अन्नपाणी सोडतो. अंथरूणावर सतत पडून असतो. लेखकाचा मित्र संपत बुढ्याला दवाखान्यात घेऊन जाऊ असे लेखकाला म्हणतो पण लेखकाचे वडील बुढ्याला भूत लागले असे समजून म्हणतात- ''अरे बुढ्याला भूत लागलं. तवा भुताला दवाखाना काय करनार. तुम्ही मव्ह ऐका. जरा दम धरा. बुढा देवाचा भगत हाय. तवा आपले पाचीतले देव त्येला कायबी व्होऊ दिनार न्हाईत. म्या आता जातू अन् जानत्याला धिऊन यितु. बाबा गेला जानत्याला आनायला. हिकडं जराशा येळानं बुढ्याच्या नरड्याची घरघर चालू झाली वाचा बंद झाली... डॉक्टर साहेबाला जिंतुरावून आनलं तवर तर बुढा मेला'' मरणाच्या दारात असले तरी असा यांचा विश्वास आहे. देवच आपल्याला तारणार यावर यांची अतोनात श्रद्धा दिसून येते. बुगाची बेलदाराची मुलगी गया ही खूप सुंदर असते. बुगाजी तिचे लग्न देवीसोबत लावून तिला मुरळी करतो. मूल होताच वाचत नसेल तर देवाला होणारे मूल सोडणार. बुगाजी चंद्रपूरच्या देवीला गयाला सोडल्यानंतर रडत रडत म्हणतो- ''म्या तितं गेल्या गेल्या होटलात चारायलु. ती खाईचना. सारखी रडत होती. झोपी घालायलु, तरी ती झोपना. मी तिला दुसऱ्या मुरळ्यापाशी बसवलं आन् हागून यितु म्हणून निगुन आलुं. त्या म्हणल्या काळजी करू नका. देवीच तारनार.... महे लेक्रु वाचत नव्हते. तवा नवस बोललु व्हतु. पयलं लेक्रु तुला सोडीन. आता पोरगी झाली. ती गया तवा तिला मुरळी सोडलु'' अशी ही देवीला माणसं मुरळी म्हणून सोडण्याची प्रथा इतर समाजाप्रमाणे यांच्यातही दिसते.

अशोक पवार यांनी बेलदारांची पालं, त्यांचे जगणे, रिती-रिवाज खान-पान या आत्मकथनातून

जिवंतपणे उभे केले आहे. लेखकासोबत वडील-लक्ष्मण, आई, भाऊ, बहीण, आजोबा, धोंडूमामा, बंडुमामा, सरीमामी, पारीमामी जिवाला जीव देणारा वासुदेवाचा संपत ही सर्व माणसे येथील व्यवस्थेच्या ऑक्टोपसी पंजात अडकलेली आहेत. या माणसांच्या भोवतीचे आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक चित्रण व एकूणच बेलदार समाजजीवनातील कांगोरे लेखकाने स्पष्ट केले आहेत. या समाजातील प्रथा, परंपरा, चोऱ्या, मारामाऱ्या, लग्न, मानपान, नातेसंबंध, सणवार, कौटुंबिक जीवन आणि या सगळ्यांमधून निर्माण होणाऱ्या समस्यांचे वास्तव चित्रण लेखकाने अत्यंत धीटपणे केले आहे. बेलदारांचे कान्हू सतीमाय हे कुलदैवत. काम मिळत नसेल, आजारपण आले असेल, संकटात सापडले असतील, चोरीचा आळ आला असेल तेव्हा हे लोक देवी सतीमायला मलिदा करतात. मलिदा केल्यावर सतीमाय दुःखाचे निवारण करते अशी या समाजाची समज आहे. लेखकाचे वडील काम मिळावे म्हणून या सतीमायला मलिदा करतात. त्याचे चित्रण करताना लेखक म्हणतो-''बुढ्यानं देवाची पाची उघडली. देव धुतले. देवाम्होरं उद जाळला. मग मलिद्याचा ढिग देवाम्होरं ठिवला. त्यावर तेलाचा दिवा लावला. समद्यावर गायीचं गोमुत्तर शिंपडलं, हामी हात जोडून देवाच्या पाया पडलु. मग बुढ्यानं देवाम्होरं मुंडकं ठिवलं. आन म्हणतु 'तोबा तोबा, तुजा गु मुत खातु कानु सती. चुकलं तर माफ कर. बाळ बच्चाला सुखानं ठिवा. आन काम लागू दी मायकासी''

अशी ही देवावरची श्रद्धा आणि या समाजाची जीवनपद्धती आहे. शिमग्याच्या दुसऱ्या दिवशी बेलदार जमातीत 'पोस' मागतात. पोसातून मिळालेल्या पैशाची दारू पितात.''दिस कलल्यावर मी, पांड्या, बाबा आन धोंड्यामामा गेलु गावात. हामी चवगाईनं हर एक दाराम्होरं जायचं. बाबानं गाणं म्हणायचं धोंड्यामामानं आन हामी नाचायचं. मग त्या घरवाला एक दोन रुपया हामाला देयाचा. असं नाचून गावून परतेकाकडून हामी पैसे मागत व्हतु. त्येला हामच्यात पोस मागनं असं म्हणत्यात'' बुगाजी बेलदार आपल्या गया नावाच्या मुलीला जेव्हा मुरळी म्हणून तिचे लग्न दगडाच्या देवीसोबत लावतो या प्रथेचे व केल्या जाणाऱ्या विधीचे चित्रण लेखकाने केले आहे. तसेच पारीमामी बाळंतीण झाल्यानंतर दूध येईपर्यंत तिला ज्वारीची राबडी व बाळाला गुळाचे पाणी का पाजतात ते सांगून बकऱ्याचा गोट कसा करतात हे लेखक झालेल्या प्रथेनुसारच चित्रण करतो. सोयरिकीच्या वेळी दारू पितात. ' हो बोली ' करतात. नवरा मुलगा मुलीला रोख रक्कम देतो. लग्नाचा अर्धा-अर्धा दोघांकडून खर्च केला जातो. आज हुंड्यासाठी जाळल्या जाणाऱ्या, मारल्या जाणाऱ्या मुली 'दिसतात'. यांच्यात मात्र मुलीला नवऱ्या मुलाकडून हुंडा द्यावा लागतो. ही पध्दती संपूर्ण भारतीयांनी आदर्श घ्यावा अशी आहे. भटक्या - विमुक्त जाती जमातींमध्ये अंतर्गत तंटेबखेडे मिटविणारी, या जाती-जमातींचे एकूणच जीवन नियत करणारी एक प्रबळ संस्था म्हणजे जातपंचायत. भटक्या जमातीमध्ये

जातपंचायतीचे वर्चस्व हे इतर समाजापेक्षा फार मोठ्या प्रमाणावर दिसून येते. ही जात पंचायत सुध्दा व्यवस्थेने बाटवलेली आहे. जो आधिक दारू देईल त्याच्या बाजूने निर्णय देणारी, न्यायनिवाडा करणारी पंच मंडळी स्वजातीचेच शोषण करते. वेगवेगळ्या स्वरूपाचे दंड आकारून शिक्षा देते. धोंड्यामामाचा मृत्यू झाल्यानंतर सरीमामी गरोदर राहते. तेव्हा बंडूमामा जातपंचायत बसवतो. जात-पंचायतीद्वारा सरीमामीला दोषी ठरवून शिक्षा दिली जाते. "सरीचं लेक्रु पाडावं अन् तिनं पुन्हा असं करु न्हाय म्हनून तिच्या ढुंगनावर उलतन तापवून चार डाग दिवावं " अशी या जातपंचायतीची अमानवी जीवघेणी शिक्षा पारीमामी सहन करून पोटचा गोळा गमावते. आणि डाग दिलेल्या ठिकाणी जखमा झाल्याने यातच तिचा अंत होतो. रामचंद्रची पत्नी रंभाबाई हिच्यावर मुसलमानाच्या छत्रीखाली बसून भजे खाल्ल्याचा आळ येतो. जातपंचायतीसमोर ती याला नकार देते. पुरावे सादर होतात आणि त्यातून भांडणे उद्‌भवतात. लेखकाची पुढे शिक्षण घेण्याची इच्छा असल्याने ते लग्नास विरोध करतात. मात्र जात पंचायतीच्या बडग्यामुळे माघार घ्यावी लागते. कोणत्याही समाजात स्त्रीचे स्थान दुय्यमंच ठरवलेलें. भटक्या जाती-जमातींच्या स्त्रियांची स्थिती तर जितकी जीवघेणी आहे तितकीच ती केविलवाणीही आहे. या स्त्रियांवर इतर प्रस्थापित समाजाकडून जसा अन्याय अत्याचार होतो तसा तो स्वसमाजातील पुरूष वर्गाकडूनही होतो. जीव कंठात येईपर्यंत राबणारी अशोक पवारची आई नवऱ्याच्या लाथाबुक्क्यांचा मार खाते. ही आई म्हणजे शोषिकतेचे एक टोक आहे. पारीमामी बाळंतीण झाल्यानंतर रात्री मुसळधार पावसामुळे वादळाने पालं उडून जातात म्हणून आडोशाला रात्री देवळात येतात. मात्र तिथला पुजारी बाळंतीनीमुळे देव बाटवला म्हणून हाकलून लावतो. अंधाऱ्या वाटेने जाताना ठेच लागून लहानगे बाळ खाली पडते आणि पाण्यात वाहून जाते. सोने लुगड्यात लपवून ठेवले असेल म्हणून पोलीस स्त्रियांचे लुगडे सोडू पाहतात. काकीला पोलीस जवळ घेऊन झ ोपतात. विरोध केला की बेदम मारतात. त्यातच तिला दिवस जातात. येथील व्यवस्थेने बेलदार समाजाला नागविले, दूर ठेवले, त्यामुळे यांना कोणत्याच स्वरूपाचे अस्तित्त्व लाभलेले दिसत नाही. व्यवस्थेबरोबरच 'बिराड'मध्ये पराकोटीचा पोलिसी अत्याचार पाहावयास मिळतो. या अत्याचारामुळे पोलिसावरील विश्वासच उडून जातो. पराकोटीचे दु:ख, मन:स्ताप, गरिबी आणि पोलिसांचा अमानुष अत्याचार यात हे बिराड सापडले आहे. म्हणूनच प्रा. रत्नदीप वानखेडे म्हणतात -''बिराडमधील एकेक ओळ अस्वस्थ करणारी आहे. एकेक प्रसंग सुन्न करणारा आहे. समाजव्यवस्था आणि निसर्ग यांच्या पार्श्वभूमीवर चाललेलं एक भयानक शोकांत नाट्य आपण पाहत आहोत असं वाटत राहतं'' याचा प्रत्यय जेव्हा सोने चोरल्याचा आळ बेलदारांवर येतो आणि पोलीस त्यांचा अमानुष छळ करतात यावरून येतो. या छळात बंडूमामा मारला जातो. रात्री जेवण झाल्यावर लहान मुलांना झोपण्याची

घाई होते. पालं नेहमीप्रमाणे गावाच्या बाहेर गोदरीतच असतात. लहान मुले घरातील स्त्रियांना 'सोने कडं- सोने कडं' असे म्हणतात. बाजूलाच शौचास बसलेला गावातील व्यक्ती हे ऐकतो. बोभाटा होतो. पोलीस गाडी घेऊन येतात. पोलीस अत्याचार करीत असताना 'सोने कड़' म्हणजे झोपायचे कुठे असा यांच्या भाषेतील अर्थ सर्वजण सांगतात पण ऐकतो कोण ? झाडाला बांधून, चटणी भरून धोंड्यामामाला पोलीस मारतात. धाऱ्याला खाली पाडून लाथाबुक्क्यांचा मार देतात. धोंड्यामामा आणि लेखकाचे वडील वेदना असह्य झाल्यावर ओरडू लागतात. ''आयो ईम कस कर पोलीस देवो. साहेब आता हामची परीक्षा घेऊ नग. हामी चोरी केलुच न्हाय. आरे देवा तू तरी ईतला कपटी झालास रे. हामाला कशाला पैदा केलं. आता उचल पटकन हामाला. लोक हो हामच्या गांडीत आग चाचलीरे. आरे पोलीस असं आपटून मारण्यापरीस हामाला धडक गोळ्या घाल म्हणजे ह्या जिवाची खटपट तरी मिटून जाईल.''असा टाहो फोडत असतानाही मार सुरूच असतो. वेदना असह्य झाल्याने धोंड्यामामा एका पोलिसाला लाथेने खाली पाडतो. याचाच परिणाम म्हणून पोलीस त्याचा जीव घेतात. वेदना असह्य झाल्याने मारापुढे गुन्हा न करूनही तो कबूल करावा लागतो.

राहायला घर नसल्याने गावाशेजारच्या गावंदरीत पालं ठोकावी लागतात. पावसाळ्यात पाऊस असल्याने कापडाच्या पालात राहणे अशक्य असते तेव्हा म्हणून शाळेच्या व्हरांड्याचा आसरा घ्यावा लागतो. एकदा लेखक आणि दुसरी दोन तीन बिऱ्हाडे असेच एका शाळेत पाच पंचवीस दिवस राहतात. मास्तर कंटाळतो. गावातील चार लोकांना आणि पाटलाला बोलावतो. बेलदारांना येथून हाकलून द्या म्हणून सांगतो. तेव्हा लेखकाचे वडील आणि यंकातात्या मास्तरला व पाटलाला दया-याचना करतात पण उपयोग होत नाही. पारीमामी पावसातच बाळंतीण होते. रात्री मुसळधार पावसात पालं उडून जातात. सर्व बेलदार रात्रीच्या आडोशाला देवळात येतात. पुजारी त्यांना हाकलतो. बंडूमामा विनवणी करून ओली बाळंतीण सोबत असल्याचे सांगतो. ओली बाळंतीण म्हटल्यावर पुजारी चिडतो. नगारा वाजवतो. गावातील लोक सर्वांना बाहेर काढतात. एक दिवसाचे लेकरू बंडू मामाच्या हातावर असते. तो ठेचकाळतो. लेकरू खाली पडते आणि पारीमामीचा हंबरडा पावसात विरून लुप्त होतो. अशोक पवारच्या लहान बहिणीचा भाजून मृत्यू झाल्यावर मसणवाट्यात खड्डा करून गाडण्यात येते. गावातील 'प्रतिष्ठित' लोकांना जेव्हा कळते की, बेलदराच्या पोरीला आपल्या मसणवाट्यात गाडल्या गेले तेव्हा गावकरी ते प्रेत उकरून काढायला भाग पाडतात. 'बिराड'मधील अशा शोषक व्यवस्थेविषयी सुनील यावलीकर म्हणतात- ''व्यवस्था छळ वेगवेगळ्या मार्गाने करते. ती कधी पोलिसाच्या रूपाने यातनाघर बनते, कधी सरपंचाच्या माध्यमातून डसते. कधी पाटलाच्या, शेटजीच्या रूपाने येऊन जिणं उद्ध्वस्त करते. पुजाऱ्याच्या माध्यमातून येऊन साधे

मानवी संकेतही नाकारते. कधी परंपरेने लादलेल्या अंधश्रद्धेच्या चोर पावलांनी येऊन जीवन नासवून टाकते. तर कधी जात पंचायतीच्या पुढाऱ्याच्या निमित्ताने जिणं उद्ध्वस्त करते. रूपं कोणतेही असोत, काम मात्र एकच 'माणसाला माणूस म्हणून जगू द्यायचं नाही.' त्याला साध्या मूलभूत गरजाही पूर्ण करू द्यायच्या नाहीत'' हे सर्व निगरघट्टपणे घडत असताना याचे कोणाला काहीच वाटत नाही. आपली जात भिकारी म्हणून हे सगळे भोगायलाच पाहिजे अशी या समाजाची वृत्ती आहे. या अन्याय-अत्याचाराच्या टोकदार धारेने लेखकाचे मन रक्तबंबाळ होते आणि आपल्या शोषणावरच जग उभे आहे याची या संवेदनशील मनाला जाणीव होते. शिक्षण वाघीणीचे दूध असले तरी सुजाण समाजाने बेलदार जमातीला सारखे बाहेर ठेवल्यामुळे त्यांना पराकोटीचे दु:ख भोगायला मिळाले. यातून त्यांच्यात भूत, दैन्य, देव-दानव, पूजा अर्चा, भूत काढणारे भगत आणि धार्मिक विधीसाठी ब्राह्मण, पुरोहित वर्ग यांना एकसारखे छडणारा कोंबड्या, बकरे, दारू खाणेपिणे करून जाणार, भूत उतरविण्याच्या नावाखाली स्त्रियांवर बंद खोलीत बलात्कार करण्याचे प्रसंग या आत्मकथनात जागोजागी येतात. कितीतरी प्रकारचे मृत्यू लेखकाने अनुभवलेले आहेत. त्यांची बहीण सोजी उकळत्या चहाचे भगुणे अंगावर पडल्याने तडफडून मरण पावते. भटक्या समाजातील संपत नावाचा मित्र अर्ध्यावर सोडून जातो. धोंड्यामामाला पोलीस मारून टाकतात, सरीमामी जखमेत अळ्या पडल्याने तडफडून मरते. पुजाऱ्याच्या कोपाने बंडूमामाला एक दिवसाचा पोर पाण्यात वाहून जातो, पारीमामीला देशमुखाने ठेवून घेऊन एका रात्री जाळून मारली हे सर्व व्यक्त करताना लेखक कुठेही आगपाखड करीत नाही. जे घडून गेले ते अत्यंत विदारकपणे मांडतो. लेखकाची शिक्षण घेऊन मोठे होण्याची धडपड अत्यंत अस्वस्थ करणारी आहे. लेखकाच्या पाचव्या वर्गाच्या प्रवेशासाठी मास्तरांनी एक कोंबडे व दारूसाठी शंभर रुपयाची लाच मागितली. लेखक ज्या वसतिगृहात राहतो ते तपासण्यासाठी जिल्ह्यावरून मोठे साहेब येतात. लेखकाने जे सत्य आहे ते साहेबांना सांगितले. परिणामी अध्यक्षांनी लेखकाला बोर्डिंगमधून हाकलून दिले. विद्यार्थी दशेत शिक्षणासाठी लेखकाने नरडे विकले, मोळया विकल्या. अशोकने काय भोगले नाही? अशोक कित्येकदा भुकेने मेला. त्याच्या तोंडचा पाण्याचा तांब्या जातीयतेने खाली पाडला. तो शिळे तुकडेच काय पण फसफसलेली आमटी खाऊन जगला. जीव जाईपर्यंत पोलिसांचा मार खाल्ला. कैदेत दिवस काढले. शिकावे वाटले म्हणून पुस्तकाची चोरी केली. ओल्या बाळंतणीवर एका नराधमाने केलेला बलात्काराचा प्रयत्न पचविला. त्याने तिसऱ्या अवस्थेत पोहोचलेला क्षय झेलला. दारिद्र्यामुळे पोटचा गोळा डोळ्यादेखत अनाथालयात टाकावा लागला. त्याने पत्नीचा व्यभिचार उघड्या डोळ्यांनी पाहिला. पोटचा गोळा जिवंत असूनही भेटत नाही. पत्नी विजयला टाकून दुसरा पती करते. हे सर्व वाचतानाच मनाचा थरकाप होतो. या

Issue - XIX, Vol. V
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.05
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan. 2020


दु:खाविषयी नरेंद्र बोडके म्हणतात -'' 'बिराड' या आत्मकथेत हे दु:ख मूळ रूपात आपल्याला भेटते. या डोंगराएवढ्या दु:खाचा एक कण जरी सुस्थित समाजातील एखाद्याच्या वाट्याला आला असता तर तो हिंसक तरी बनला असता किंवा त्याने आत्महत्या तरी केली असती'' पण अशोक पवार जिवंत राहतात ते आपल्या समाजाचा उद्धार करण्यासाठी. शिक्षण जेमतेम मॅट्रिक पर्यंतच झालेले असले तरी या लेखकाला आत्मभान आलेले दिसते. म्हणूनच तर जातीच्या पुढाऱ्याने अडवणूक करूनही त्यांच्या घरात डॉ. बाबासाहेब आंबडेरांचे छायाचित्र दिसते. जात पंचायतीला न जुमानता लेखक परिवर्तनाची भाषा बोलू लागतो. जगाचा यानंतरचा संघर्ष केवळ भाकरीसाठी होईल असे भाषणातून भाकित वर्तवितो. अशोक पवारांची पंचविशीतली ही कहानी. त्यांनी जे जे भोगले, ज्या भाषेत भोगले त्याच भाषेत लिहून काढले. हे लेखन एवढे जिवंत, रसरशीत, नेमके आणि चिरेबंदी आहे की, याकडे एक अद्वितीय कलाकृती म्हणून पाहावे लागते. आपल्या आणि आपल्या जातीच्या जीवनाची जीवघेणी कहानी 'बिराड'च्या रूपाने लेखकाने आपल्यासमोर ठेवली आहे.

**निष्कर्ष :**

१. बेलदार जमातीच्या भीषण दु:खाचा चेहरा दर्शविणारे मराठीतील 'बिराड' हे अत्यंत महत्त्वपूर्ण आत्मकथन आहे.

२. बेलदार जमातीचे हे 'बिराड' कोण्या जनावराच्या पाठीवरचे ओझे नसून अज्ञान, अंधश्रद्धा, दु:ख, दैन्य, दास्य आणि लाचारीचे बिऱ्हाड आहे.

३. 'बिराड' आत्मकथनातून अशोक पवार यानी जीवघेण्या अव्हेरलेल्या जीवनाची कथा सांगितलेली असली तरी ही कथा मूलभूत गरजा नाकारलेल्या अखिल भटक्यांची कथा झालेली आहे.

४. अशोक पवार यांनी बेलदार जमातीचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन 'बिराड' मधून जिवंतपणे उभे केले आहे.

५. 'बिराड' मधील लेखन एवढे जिवंत, रसरसित, नेमके आणि चिरेबंदी आहे की, याकडे एक अद्वितीय कलाकृती म्हणून पाहावे लागते.

## संदर्भ सूची :-

१. अशोक पवार, 'बिराड', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे-२००१ (आ.प.)
२. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग', सुगावा प्रकाशन, पुणे-१९८९ (आ.प.)
३. डॉ. प्रल्हाद लुलेकर, 'वेदनांचा प्रदेश', कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद-२००१
४. डॉ. आरती-कुसरे कुलकर्णी 'दलित स्वकथने साहित्यरूप', विजय प्रकाशन, नागपूर